पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005



दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25



विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर



अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १९२। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | रविवार ०९/०८/२०२६ । पाने - ६



लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र


# संगमनेरकरांनो उठा, जागे व्हा आणि जाब विचारा !

## नाशिक-पुणे रेल्वेसाठी रविवारी महामार्गावर होणार चक्काजाम




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- अनेक वर्षांच्या पाठपुराव्यानंतर प्रत्यक्ष मार्गी लागलेली नाशिक-पुणे संगमनेर मार्गे रेल्वे अचानक शिर्डी मार्गे वळाली. त्यामुळे हातातोंडाशी आलेला घास जणू कोणी हिरावून घेतला अशी संतप्त भावना संगमनेर अकोलेकरांची झाली. त्यामुळे ही रेल्वे संगमनेरमार्गे नेण्याची मागणी आता पुन्हा एकदा निर्णायक वळणावर आली आहे. संगमनेरमार्गे नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्पाला मोठ्या संघर्षानंतर चालना मिळाली असताना, आता हा मार्ग संगमनेरपासून दूर जाण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे संगमनेरकरांनी आता केवळ चर्चा न करता जाब विचारण्याची आणि आपल्या हक्कासाठी रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे, अशी भूमिका 'संगमनेरमार्गे नाशिक-पुणे रेल्वे' समर्थकांनी घेतली आहे.

या मागणीसाठी रविवार, ९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजता महामार्गावर हिवरगाव पावसा टोलनाका, संगमनेर येथे 'चक्काजाम आंदोलन' करण्यात येणार असून सरकारचे लक्ष वेधण्यासाठी सिन्नर, संगमनेर, जुन्नर, नारायणगाव येथे महामार्ग ठप्प करण्यात येणार आहे.

यासाठी आ. सत्यजित तांबे यांच्या नेतृत्वाखाली जन आंदोलनात उभारण्यात येत आहे. नाशिक-पुणे रेल्वे मार्गासाठी अनेक वर्षांपासून विविध स्तरांवर पाठपुरावा सुरू होता. संगमनेरमार्गे रेल्वे गेल्यास नाशिक आणि पुणे या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणारा हा मार्ग संगमनेर, अकोले परिसरासह संपूर्ण भागाच्या विकासाला मोठी चालना देऊ शकतो. मात्र आता या प्रस्तावित मार्गाबाबत निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे स्थानिकांमध्ये नाराजी वाढत आहे. अनेक वर्षांच्या अथक लढ्यानंतर नाशिक-पुणे रेल्वेचे काम प्रत्यक्ष सुरू झाले होते; २०२७ पर्यंत हा मार्ग पूर्ण झाला असता... मात्र आपल्यासोबत धोका झाला, असा दावा आता संगमनेरकर जनता करीत आहेत.

**रेल्वे रद्द झाल्यास संगमनेरचे नेमके काय नुकसान?-** ज्या रेल्वे मार्गाचे स्वप्न पाहिले आणि ती प्रत्यक्षात येत असतानाच अचानक तीने वळण घेतले. त्यामुळे संगमनेरमार्गे रेल्वे न झाल्यास होणाऱ्या संभाव्य परिणाम पुढील अनेक पिढ्यांना भोगावे लागणार आहे.

**शेतकऱ्यांना बसणार मोठा फटका-** संगमनेर परिसर हा शेती आणि दुग्धव्यवसायासाठी महत्त्वाचा भाग आहे. जलद आणि स्वस्त रेल्वे वाहतूक उपलब्ध झाल्यास कृषिमाल पुणे-नाशिकसह मोठ्या बाजारपेठांमध्ये कमी खर्चात आणि योग्य भावात पोहोचविणे शक्य झाले असते. दूध, फळे, भाजीपाला यांसारखा नाशवंत माल सुरक्षित आणि कमी वेळेत बाजारपेठेत पोहोचविण्याची सुविधा निर्माण झाली असती. तसेच शेती उत्पादनांची निर्यात आणि व्यापक बाजारपेठेशी जोडणी होण्यास मदत होईल.

**विद्यार्थी आणि नोकरदारांची गैरसोय-** सध्या संगमनेरहून पुणे अथवा नाशिकला जाण्यासाठी रस्ते वाहतुकीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते. पत्रकानुसार, पुणे-नाशिक रेल्वे झाल्यास संगमनेर-पुणे अंतर सुमारे दीड तासात, तर संगमनेर-नाशिक अंतर सुमारे ४५ मिनिटांत गाठणे शक्य झाले असते. विद्यार्थी, नोकरदार आणि व्यावसायिकांना दररोजच्या प्रवासासाठी मोठा फायदा झाला असता. वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका, इंधन खर्च आणि प्रवासाचा वेळ यामध्येही मोठी बचत झाली असती.

**रोजगार आणि उद्योगांच्या विकासाला बसणार फटका?**

रेल्वे मार्ग हा केवळ प्रवासाचे साधन नसून एखाद्या परिसराच्या आर्थिक विकासाचा महत्त्वाचा आधार असतो. संगमनेरमार्गे रेल्वे झाल्यास कृषी मालावर आधारित उद्योग, गोदामे, शीतगृहे, प्रक्रिया उद्योग तसेच नव्या औद्योगिक गुंतवणुकीला चालना मिळू शकते, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. रेल्वेमुळे दळणवळणाची सुविधा वाढल्यास नव्या उद्योगांसाठी संगमनेर अधिक आकर्षक ठरू शकतो आणि स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे रेल्वेचा मार्ग बदलल्यास किंवा संगमनेरला वगळल्यास या संधीवरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली आहे.

**संगमनेरमार्गे प्रस्तावित रेल्वेच्या काही महत्त्वाच्या बाबी अधोरेखित करण्यात आल्या आहेत.**

**सेमी-हायस्पीड डबल लाईन रेल्वे - ताशी सुमारे २०० किलोमीटर वेगाची क्षमता. पुणे-नाशिक थेट जोडणी - प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होण्याची शक्यता. वेट मालवाहतूक सुविधा - कृषी व इतर मालाची जलद वाहतूक करण्यास मदत. संगमनेरमध्ये नवीन रेल्वे स्टेशन - शहराच्या व्यापार आणि पर्यटनाला चालना मिळण्याची अपेक्षा.**

या सुविधा प्रत्यक्षात आल्यास संगमनेरच्या विकासाला नवी दिशा मिळू शकते. त्यामुळे आताच नाही तर कधीच नाही असा निर्धार करत नागरिकांनी आंदोलनात सहभागी व्हावे.

**आता संगमनेरकरांनी एकत्र येण्याची गरज-** नाशिक-पुणे रेल्वे हा केवळ रेल्वेचा प्रकल्प नसून संगमनेरच्या भविष्यातील आर्थिक, शैक्षणिक आणि औद्योगिक विकासाशी जोडलेला विषय असल्याचे संगमनेर अकोलेकरांचे म्हणणे आहे. त्यामुळे पक्षीय राजकारण बाजूला ठेवून सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, व्यापारी, शेतकरी, विद्यार्थी, नोकरदार, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांनी या प्रश्नावर एकत्र येण्याची गरज आहे. त्यासाठी गेल्या काही दिवसांपासून वेगवेगळ्या घटकांसोबत बैठका देखील चालू आहे. दैनिक युवावार्तासह विविध माध्यमांनी देखील हा प्रश्न ऐरणीवर आणून जनजागृती केली आहे. त्यामुळे याची दखल घ्यावीच लागेल.

संगमनेरकरांनो, उठा... जागे व्हा आणि जाब विचारा! असा संदेश देत ९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता हिवरगाव पावसा टोलनाका येथे चक्काजाम आंदोलन करण्याचा निर्धार संगमनेर करांनी केला आहे. आणि त्याला मोठा प्रतिसाद देखील मिळताना दिसत आहे.

## पुणे-नाशिक रेल्वे सरळ मार्गेच झाली पाहिजे - खा. अमोल कोल्हे



हा प्रश्न मी गेली अनेक वर्षांपासून सडक ते संसद अशा प्रत्येक व्यासपीठांवर सातत्याने लावून धरला आहे. लोकसभा, रेल्वे मंत्रालय तसेच मतदारसंघातील प्रत्येक व्यासपीठावर, जेथे संधी मिळेल तेथे पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वेच्या प्रश्नावर आवाज उठविला आहे. पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे ही सिन्नर-संगमनेर-नारायणगाव-मंचर-चाकण या सरळ मार्गानेच झाली पाहिजे. असे खा. अमोल कोल्हे यांनी म्हटले आहे. या मार्गाचा डीपीआर २०२० मध्ये मंजूर झाला, भूसंपादनाची प्रक्रियाही सुरू झाली. मात्र नंतर मार्ग बदलण्याचा घाट घातला गेला. 'जीएमआरटी'चे कारण पुढे करत हा प्रकल्प शिर्डीमार्गे वळविण्याचा निर्णय जाहीर झाला, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, जपान, फ्रान्स, पोलंड, फिनलंड, कॅनडा, न्यूझीलंडसह जगातील १५ देशांमध्ये रेडिओ दुर्बीण आणि रेल्वेमार्ग एकत्र नांदू शकतात, तर मग आपल्या देशात का नाही, असा मुद्दा उपस्थित करीत रेल्वे मंत्रालय, अणुऊर्जा विभाग आणि एनसीआरए यांची त्रिस्तरीय तांत्रिक समिती नेमून तिचा अहवाल संसदेसमोर ठेवावा, ही मागणी मी रेटून धरली.

## नाशिक-पुणे रेल्वे सरळ मार्गानेच - खा. भाऊसाहेब वाकचौरे



नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या नव्याने जाहीर झालेल्या शिर्डीमार्गे वळवलेल्या आराखड्याचा तातडीने पुनर्विचार करून सिन्नर-संगमनेर(अकोले)-नारायणगाव-मंचर-चाकण मार्गे थेट नाशिक-पुणे जोडणी द्यावी, अशी ठाम मागणी शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी रेल्वेमंत्री श्री. अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे.

औद्योगिक, शैक्षणिक आणि कृषी केंद्रांदरम्यान थेट रेल्वे जोडणीची दशकांपासूनची मागणी आता निर्णायक टप्प्यात आली होती. मात्र, जाएमआरटी संवेदनशील क्षेत्र टाळण्याच्या कारणामुळे मार्ग बदलला जात असला तरी तो आम्हाला मान्य नाही. ही रेल्वे सरळ मार्गे गेल्यास अकोले सारख्या आदिवासी भागाच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे. नाशिक-पुणे या पट्ट्यात संगमनेर अकोलेचा विकास देखील झपाट्याने होईल.


ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30% 70% डिस्काउंट सेल
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

PBM Jewellers
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# नाशिक -पुणे रेल्वे मार्गासाठी आम्हीही लढ्यात सक्रिय आहोत



## सरळ रेल्वे मार्गासाठी क्रांतीदिनी आ. तांबेंनी पुकारले जनआंदोलन

पुणे-नाशिक सरळ रेल्वे प्रकल्पाबाबत केंद्र सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, या मागणीसाठी पुणे-नाशिक महामार्गावर ठिकठिकाणी चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. क्रांतीदिनी म्हणजे ९ ऑगस्टला सकाळी हे जनआंदोलन करणार असल्याची माहिती आमदार सत्यजित तांबे यांनी दिली.

सत्यजीत तांबे यांनी रेल्वे प्रकल्पाच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त करत, हा मार्ग या भागातून गेला नाही तर पुढील अनेक पिढ्यांसाठी विकासाची मोठी संधी हुकू शकते, असे मत व्यक्त केले. रेल्वेसारखे पायाभूत प्रकल्प वारंवार मंजूर होत नसल्याने हा निर्णय संपूर्ण उत्तर पुणे आणि अहिल्यानगर-नाशिक पट्ट्यासाठी महत्त्वाचा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या मते, प्रकल्पाबाबत केंद्र सरकारकडून वेगवेगळे संकेत मिळत असले, तरी स्थानिक नागरिकांची मागणी कायम आहे. त्यामुळे आर्थिक गणितापेक्षा जनहिताला प्राधान्य देऊन सरकारने या रेल्वेमार्गासाठी प्रयत्न करावे, अशी मागणी त्यांनी केली.



**आ. सत्याजीत तांबे**
नाशिक पदवीधर मतदारसंघ

## आमदार अमोल खताळ यांचा रेल्वे मार्गासाठी सततचा पाठपुरावा

आमदार अमोल खताळ यांनी पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाबाबत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन प्रकल्पासंदर्भातील विविध मुद्द्यांवर नुकतीच सविस्तर चर्चा केली. या बैठकीत प्रकल्पामुळे नाशिक, अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्याच्या विकासाला मिळणाऱ्या चालनेबाबत तसेच नागरिकांच्या अपेक्षांबाबत चर्चा झाली.


पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे मार्गाच्या प्रस्तावित संरेखनामुळे खोडद येथील जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप संदर्भात निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणी आणि त्यामुळे प्रकल्पाच्या कामाला होत असलेला विलंब याकडे रेल्वेमंत्र्यांचे लक्ष वेधण्यात आले. या प्रकल्पाबाबत संबंधित जिल्ह्यांतील नागरिकांमध्ये मोठ्या अपेक्षा असून, हा प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लागावा अशी लोकभावना असल्याचेही त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच या संदर्भात डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय तज्ज्ञ समितीची स्थापना केली आहे.



**आ. अमोल खताळ**
संगमनेर विधानसभा

## मार्ग बदलल्यास तीन जिल्ह्यांना कोणताही फायदा नाही - खा. वाजे

खा. राजाभाऊ वाजे यांचे नाशिक-पुणे रेल्वेबाबतचे मत अतिशय स्पष्ट आणि आग्रही आहे. हा सेमी हायस्पीड रेल्वेमार्ग मूळ नियोजित सिन्नर-संगमनेर मार्गेच व्हावा, अशी त्यांची आग्रही मागणी आहे. या प्रकल्पाबद्दलचे त्यांनी सांगितले की या मार्गात बदल नको. हा मार्ग शिर्डीमार्गे नेण्याच्या प्रस्तावाला त्यांचा कडाडून विरोध आहे. शिर्डीमार्गे मार्ग केल्यास नाशिक आणि सिन्नरच्या औद्योगिक विकासाला मर्यादा येतील, असा त्यांचा दावा आहे. नवीन नियोजित मार्गामुळे विद्यार्थी, कामगार, शेतकरी आणि उद्योजकांना कोणताही फायदा होणार नाही. मूळ सिन्नर-संगमनेर-नारायणगाव-मंचर-चाकण हा मार्गच औद्योगिक व रोजगाराच्या दृष्टीने योग्य आहे. सिन्नर औद्योगीक वसाहतीसाठी या रेल्वे प्रकल्पामुळे मोठा फायदा होणार आहे. या प्रकल्पासाठी त्यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन नाशिकच्या भाजप आमदार सीमा हिरे यांच्यासोबत संयुक्तपणे पाठपुरावा केला आहे.



**– खा. राजाभाऊ वाजे**
नाशिक लोकसभा मतदारसंघ

## नाशिक-पुणे रेल्वेचा मार्ग बदलू नका : आ. माणिकराव कोकाटे

आमदार माणिकराव कोकाटे यांचे नाशिक-पुणे रेल्वेबद्दल ठाम मत आहे की, हा रेल्वे प्रकल्प मूळ नाशिक-सिन्नर-संगमनेर-चाकण-पुणे याच सरळ मार्गाने झाला पाहिजे. या मार्गात बदल नको. हा प्रकल्प शिर्डी किंवा अहिल्यानगर मार्गे वळवण्यास त्यांचा तीव्र विरोध आहे. मूळ नियोजित मार्गात बदल केल्यास सिन्नर आणि संगमनेरसारख्या भागांचे मोठे नुकसान होईल, असे त्यांचे मत आहे. हा थेट मार्ग उत्तर महाराष्ट्र आणि पुणे या दोन्ही परिसरांच्या आर्थिक व औद्योगिक विकासासाठी अतिशय फायदेशीर आहे. यासाठी त्यांनी विधिमंडळात आणि सर्वपक्षीय बैठकांमध्ये सातत्याने पाठपुरावा केला आहे. नाशिक-शिर्डी किंवा अहिल्यानगर-पुणे या स्वतंत्र रेल्वे मार्गांना त्यांचा किंवा इतर लोकप्रतिनिधींचा विरोध नाही, परंतु 'नाशिक-पुणे' हक्काची सरळ मार्गावरील रेल्वे बदलून ती इतरत्र नेऊ नये, अशी त्यांची स्पष्ट भूमिका आहे. या थेट मार्गासाठी ते अन्य लोकप्रतिनिधींसह आग्रही असून, प्रकल्पाला गती मिळावी यासाठी त्यांनी विविध जनआंदोलनांत आणि मुंबई येथील उच्चस्तरीय बैठकांत सहभाग नोंदवला आहे.



**आ. माणिकराव कोकाटे**
सिन्नर विधानसभा मतदारसंघ

## पुणे-नाशिक रेल्वेचा मूळ मार्ग कायम ठेवा : ना. आढळराव पाटील

माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांची पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्पाबद्दलची ठाम भूमिका अशी आहे की, हा प्रकल्प पूर्वनियोजित व सरळ मूळ मार्गानेच (पुणे-चाकण-खेड-मंचर-नारायणगाव-आळेफाटा-संगमनेर-सिन्नर-नाशिक) झाला पाहिजे. अलीकडे रेल्वे मार्गात बदल करून चाकण, मंचर, नारायणगाव यांसारख्या महत्त्वाच्या औद्योगिक व व्यावसायिक भागांना बायपास (वगळण्यात) करण्यात आले आहे. या बदलामुळे आढळराव पाटलांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. मार्गातील बदलांमुळे परिसराच्या भविष्यातील औद्योगिक, व्यापारी आणि शैक्षणिक विकासाला मोठा फटका बसेल, अशी खंत त्यांनी व्यक्त केली आहे.जीएमआरटी चा मुद्दा: 'जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप' मुळे रेल्वेमार्गास अडथळा निर्माण होतो हा दावा त्यांनी तांत्रिकदृष्ट्या चुकीचा असल्याचे म्हटले आहे. या प्रकल्पाचा तिढा सोडवण्यासाठी राज्य शासनाने ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या तज्ज्ञ समितीचे त्यांनी स्वागत केले आहे.



**– ना. शिवाजीराव आढळराव पाटील**
अध्यक्ष म्हाडा (म. राज्य)

## मूळ मार्ग कायम ठेवून प्रकल्प लवकर पूर्ण करा - आ. बेनके

नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वे मार्गाच्या माध्यमातून जुन्नर, नारायणगाव तसेच परिसरातील औद्योगिक, कृषी आणि व्यापारी विकासाला मोठी चालना मिळणार असल्याने हा प्रकल्प कोणत्याही अडथळ्याविना आणि निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करावा, अशी आग्रही भूमिका आमदार अतुल बेनके यांनी सातत्याने मांडली आहे. या प्रकल्पासाठी त्यांनी राज्य सरकारकडे विशेष पाठपुरावा केला असून, रेल्वेचा मूळ प्रस्तावित मार्ग कायम ठेवण्याची मागणी केली आहे. या रेल्वे प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम अवघ्या साडेतीन वर्षांत पूर्ण होऊ शकतो. अशी भूमिका आमदार बेनके यांनी मांडली आहे. भूसंपादन आणि अन्य प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण करून प्रत्यक्ष बांधकामाला गती देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली आहे. नाशिक-पुणे रेल्वे मार्ग हा केवळ प्रवासी वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा नसून, जुन्नर, नारायणगाव आणि परिसरातील औद्योगिक व कृषी अर्थव्यवस्थेसाठी भविष्यातील महत्त्वाचा दुवा ठरणार आहे.



**आ. अतुल बेनके**
जुन्नर विधानसभा मतदारसंघ

## डॉ. अनिल काकोडकर समितीचे स्वागत - आ. डॉ. किरण लहामटे

आमदार डॉ. किरण लहामटे (अकोले विधानसभा) यांचे नाशिक-पुणे रेल्वेबाबतचे मत अतिशय स्पष्ट आहे. त्यांनी अनेकदा पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे आपल्या मूळ आराखड्यानुसारच (प्रस्तावित मार्गाने) झाली पाहिजे, अशी ठाम भूमिका घेतली आहे. हा रेल्वे मार्ग अकोले आणि संगमनेर तालुक्यांमधूनच गेला पाहिजे, असा त्यांचा मुख्य आग्रह आहे. मूळ आराखड्यात समाविष्ट असलेल्या अकोले तालुक्यातील 'देवठाण' येथे रेल्वे स्टेशन असायलाच हवे, अशी मागणी त्यांनी सातत्याने राज्य शासनाकडे केली आहे.खोडद (जि. पुणे) येथील जीएमआरटी **(GMRT)** रेडिओ दुर्बिणीच्या कारणास्तव रेल्वेचा मूळ मार्ग बदलण्यात आला होता. त्यानंतर राज्य सरकारने ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली जीएमआरटीच्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी जी समिती स्थापन केली आहे, त्याचे डॉ. लहामटे यांनी स्वागत केले आहे.



**आ. डॉ. किरण लहामटे**
अकोले विधान सभा,लोकप्रतिनिधी
ता. अकोले, जि. अहिल्यानगर

# आमदार सत्यजित तांबे यांचा अभ्यासू लढा

## संगमनेरच्या रेल्वे मार्गासाठी फुंकले रणशिंग! पुणे-नाशिक रेल्वे संगमनेर मार्गेच!



**पुणे–नाशिक रेल्वे संगमनेर मार्गेच व्हावी या मागणीसाठी आमदार सत्यजित तांबे यांनी तीव्र लढा पुकारला आहे. जीएमआरटी दुर्बिणीच्या तांत्रिक कारणास्तव मूळ मार्ग बदलून शिर्डीमार्गे नेण्याचा प्रयत्न राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोप करत, ६०० कोटींचा निधी वाया घालवण्याविरोधात सर्वपक्षीय एकजुट बांधण्यात आली आहे. डॉ. अनिल काकोडकर समितीच्या तांत्रिक तोडग्यांच्या आधारे हा मार्ग संगमनेरवरून नेण्यासाठी ९ तारखेच्या जनआंदोलनात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मा. मंत्री बाळासाहेब थोरात. डॉ. सुधीर तांबे यांनी केले आहे.**

पुणे-नाशिक सेमी-हायस्पीड रेल्वे प्रकल्प हा केवळ दोन शहरांना जोडणारा मार्ग नसून, उत्तर महाराष्ट्राच्या, विशेषतः अहमदनगर आणि पुणे जिल्ह्यांतील ग्रामीण भागाच्या विकासाची जीवनरेखा आहे. चाकण, राजगुरुनगर, मंचर, नारायणगाव, संगमनेर आणि सिन्नर या समृद्ध आणि औद्योगिकदृष्ट्या वेगाने विकसित होणाऱ्या पट्ट्याला जोडणारा हा मूळ प्रस्तावित मार्ग गेल्या काही काळापासून तांत्रिक अडचणींच्या गर्तेत सापडला होता. मात्र, लोकभावना, स्थानिक गरज आणि वैज्ञानिक तोडगा यांचा मेळ घालत या प्रश्नाला सकारात्मक दिशेने नेण्याचे मुख्य श्रेय तरुण, अभ्यासू आणि दूरदृष्टी असलेले आमदार सत्यजित तांबे यांच्या मुत्सद्दी नेतृत्वाला जाते.

पुणे-नाशिक रेल्वेचा मूळ मार्ग संगमनेरवरूनच जाणार होता. परंतु, नारायणगावजवळील खोडद येथे आंतरराष्ट्रीय ख्यातीची '**जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप**' (जीएमआरटी) ही दुर्बीण आहे. रेल्वेच्या विद्युत-चुंबकीय लहरींमुळे (Electromagnetic Interference) या दुर्बिणीच्या अतिसंवेदनशील संशोधनात अडथळा निर्माण होऊ शकतो, असा आक्षेप वैज्ञानिक संस्थांनी घेतला. असं सांगितलं गेलं.या आक्षेपानंतर रेल्वे प्रशासनाने मूळ मार्ग रद्द करून तो अहिल्यानगर-शिर्डी मार्गे वळवण्याच्या हालचाली सुरू केल्या.पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वेमार्ग मूळ आराखड्यानुसार संगमनेरवरून नेण्याऐवजी तो अचानक शिर्डीमार्गे वळवण्याचा जो घाट घातला जात आहे, त्यामागे केवळ तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणे नसून स्पष्टपणे राजकीय हितसंबंध आणि हस्तक्षेप कारणीभूत आहे, हे उघड सत्य आहे.

कारण भूसंपादनासह इतर प्राथमिक कामांवर आधीच ६०० कोटी रुपयांचा निधी खर्च झालेला असून जमिनीचे अधिग्रहणही झाले आहे. असे असताना, मूळ मार्ग बदलून सार्वजनिक तिजोरीतील अब्जावधी रुपयांचा अपव्यय करणे आणि आधी झालेला ६०० कोटींचा खर्च पाण्यात घालणे, हा थेट जनतेच्या करांच्या पैशांचा अनादर आहे.

विकासप्रकल्पातून एका विशिष्ट प्रदेशाला आणि तिथल्या नागरिकांना राजकीय हेतूने डावलण्याच्या या धोरणामुळे संगमनेर आणि परिसरातील जनतेमध्ये तीव्र संताप व असंतोष उसळला आहे. लोकहित, आर्थिक व्यवहार्यता आणि प्रादेशिक समतोल बाजूला सारून केवळ राजकीय स्वार्थापोटी घेतलेला हा निर्णय लोकशाही तत्त्वांना हरताळ फासणारा आहे. या निर्णयामुळे संगमनेर आणि अकोले परिसरातील नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि तरुणांमध्ये प्रचंड असंतोष पसरला. थेट मार्ग सोडून वळण मार्ग घेतल्यास संगमनेरसारखे प्रमुख आर्थिक केंद्र रेल्वेच्या नकाशावरून बाहेर पडणार होते, जे या भागाच्या भविष्यासाठी अत्यंत अन्यायकारक ठरले असते.

अशा गंभीर प्रसंगी आमदार सत्यजित तांबे यांनी केवळ राजकीय वक्तबाजी न करता अत्यंत हुशारीने, अभ्यासपूर्ण आणि मुत्सद्दी मार्गाने हा प्रश्न हाती घेतला. हा विषय केवळ संगमनेरपुरता मर्यादित न ठेवता, त्यांनी पुणे ते नाशिक या संपूर्ण मार्गावरील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींना एकत्र आणण्याचे काम केले. आमदार सत्यजित तांबे यांनी ही लढाई तीन प्रमुख पातळ्यांवर लढली: पुणे, शिरूर, आंबेगाव, जुन्नर, संगमनेर, अकोले आणि नाशिक परिसरातील सर्व आमदार आणि खासदारांना एका व्यासपीठावर आणून त्यांनी 'रेल्वे संगमनेर मार्गेच व्हावी' यासाठी सरकारवर भक्कम राजकीय व प्रशासकीय दबाव निर्माण केला. जीएमआरटी दुर्बिणीचे वैज्ञानिक महत्त्व टिकवून ठेवूनही रेल्वेमार्ग नेणे शक्य आहे, हे त्यांनी विविध तांत्रिक दाखले देत शासन व प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. जनतेच्या तीव्र भावना आणि ९ ऑगस्टच्या 'चक्का जाम'सारख्या लोकआंदोलनांना योग्य दिशा देऊन शासनाला हा विषय गांभीर्याने घेण्यास भाग पाडले.जानार आहे.

**शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर समिती आणि तांत्रिक तोडगा** - जनतेचा प्रचंड रेटा आणि आमदार तांबे यांच्या नेतृत्वाखालील लोकप्रतिनिधींच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अखेर महाराष्ट्र शासनाने नमती भूमिका या अगोदर घेतली घेतली. देशाचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय अभ्यास समितीची स्थापना करण्यात आली. या समितीचे मुख्य उद्दिष्ट जीएमआरटी दुर्बिणीचे रक्षण करून संगमनेर मार्गेच रेल्वे नेण्यासाठी तांत्रिक तोडगे शोधणे हे आहे. सध्या या समितीमार्फत खालील प्रमुख तांत्रिक पर्यायांवर विचार केला जात आहे:

भूमिगत बोगदे (Underground Tunnels): दुर्बिणीच्या अतिसंवेदनशील परिसरात रेल्वे मार्ग जमिनीखालून नेऊन रेडिओ लहरी पूर्णपणे रोखणे.

**इलेक्ट्रोमॅग्नेटिक शील्डिंग:** रेल्वे ट्रॅक आणि ओव्हरहेड वायर्सच्या भोवती विशेष फॅराडे केज (Faraday Cage) आणि जाळ्या बसवून लहरी बाहेर पडण्यापासून रोखणे. रिजिड कंडक्टर सिस्टीम (ROCS): विद्युत ठिणग्या (Sparks) निर्माण न होणारे अत्याधुनिक ओव्हरहेड तंत्रज्ञान वापरणे. दुर्बिणीच्या २५-३० किमी पट्ट्यात ओव्हरहेड विजेचा वापर टाळून गाड्या पर्यायी ऊर्जेवर चालवणे.

**विजयाचा आणि विश्वासाचा टप्पा -**

अनेकदा विकास आणि तंत्रज्ञान यांच्यात संघर्ष होतो, परंतु लोकप्रतिनिधीकडे राजकीय परिपक्वता आणि दूरदृष्टी असेल तर या दोघांचा मेळ घालून मार्ग काढता येतो, हे सत्यजित तांबे यांनी दाखवून दिले आहे. पुणे ते नाशिक दरम्यानच्या सर्व लोकप्रतिनिधींना एकत्र बांधून ठेवण्याची त्यांची क्षमता आणि विषयाचा सखोल अभ्यास यामुळे या लढ्याला मोठे यश मिळत आहे.

डॉ. अनिल काकोडकर समितीच्या स्थापनेमुळे संगमनेरकरांच्या आणि संपूर्ण परिसराच्या आशेला नवी पालवी फुटली आहे. तांत्रिक पर्याय शोधून खोडदच्या दुर्बिणीचे रक्षणही होईल आणि संगमनेरवरून धावणारी रेल्वे या परिसराच्या औद्योगिक, कृषी आणि शैक्षणिक विकासाला एक नवी गती देईल, असा ठाम विश्वास आज संपूर्ण जनतेला वाटत आहे. लोकशाहीत जनतेचा रेटा आणि लोकप्रतिनिधीची हुशारी एकत्र येते, तेव्हा यश निश्चितच मिळते!

येत्या ९ तारखेला होणाऱ्या जनआंदोलनात आपल्या सर्वांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. आमदार सत्यजित तांबे यांनी जनतेच्या प्रश्नांसाठी आणि न्यायासाठी दिलेल्या हाकेला साथ देत, या आंदोलनात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, ही नम्र विनंती.आज नाही, तर कधीच नाही या निर्धाराने आपण सर्वांनी एकत्र येऊन आमदार सत्यजित तांबे यांच्या या लढ्याला पूर्ण सहकार्य करूया आणि आंदोलन यशस्वी करूया.

**डॉ.नामदेव गुंजाळ**
**संगमनेर, मो. ९८२२०६०६०४**








आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# वृक्ष मित्र मनीष मालपाणी यांच्या वाढदिवसानिमित्त धांदरफळ बुद्रुक येथे ७ हजार वृक्षांचे रोपन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या मालपाणी परिवारातील प्रसिद्ध उद्योजक 'वृक्ष मित्र' मनीष मालपाणी मित्रमंडळाच्यावतीने संगमनेर तालुक्यातील धांदरफळ बुद्रुक येथे विविध सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आले. ग्रामपंचायत, लोकमान्य विद्यालय, स्वदेश उद्योग समूह, स्वदेश मित्रपरिवार, रामेश्वर देवस्थान विश्वस्त मंडळ आणि पंचशील मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने तब्बल ७ हजार वृक्षांचे रोपण करण्यात आले.

धांदरफळ बुद्रुक ग्रामपंचायतीचे हे अमृत महोत्सवी वर्ष असल्याने संपूर्ण परिसरात ७५ हजार वृक्षारोपणाचा संकल्प सोडण्यात आला आहे. याच मोहिमेअंतर्गत जेतवन, कारेश्वर डोंगर आणि रामेश्वर मंदिर परिसरात ७ हजार रोपे लावली गेली. उद्योजक बाळासाहेब देशमाने यांनी 'हरित धांदरफळ, वृक्षमय धांदरफळ' असा नारा देत 'स्वदेश वृक्ष भेट' योजनेद्वारे नागरिकांना वृक्ष संवर्धन मोहिमेत सहभागी करून घेतले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मनीष मालपाणी म्हणाले, कर्माला योगाची जोड मिळाली की तो कर्मयोगी ठरतो. खांडगावचा

'वन ट्री डोंगर', धांदरफळचा 'कारेश्वर डोंगर' आणि कहे घाट परिसर हरितमय करण्यात सर्वांचा मोठा वाटा आहे. तसेच विद्यार्थ्यांनी शिकण्याची जिद्द ठेवून आधुनिक संगणकीय ज्ञानावर भर दिला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. धांदरफळ परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी मालपाणी परिवाराकडून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रासाठी ६ लाखांचे डिजिटल संगणक लॅब, लोकमान्य विद्यालयासाठी १० लाखांचे इंटरॅक्टिव्ह पॅनल, रामेश्वर देवस्थान येथे नवीन श्रीराम मंदिर निर्माणसाठी २० लाख, प्रवरा नदी घाटासाठी ५ लाखांची विद्युत रोषणाई, जेतवन परिसर व वृक्षारोपणासाठी २१ हजार रुपये व परिसराचे सुशोभीकरण यांचा समावेश आहे. यापूर्वी कारेश्वर डोंगरावर ५१ हजार झाडे लावून हा परिसर मालपाणी परिवाराने नटवला आहे.

याप्रसंगी सुवर्णा मालपाणी, गिरीश मालपाणी, रचना मालपाणी, जय मालपाणी, सरपंच उज्वला देशमाने, उपसरपंच भारत कोल्हे, बाळासाहेब देशमाने, भाऊसाहेब डेरे, रामेश्वर देवस्थानचे अध्यक्ष सुनील देशमुख, विश्वस्त मंडळ, स्वदेश युवा प्रतिष्ठान सर्व शिलेदार, लोकमान्य विद्यालयाचे प्राचार्य एकनाथ झावरे, शिक्षक, विद्यार्थी, माता पालक समिती सदस्य मंडळ आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन दत्ता कासार यांनी केले तर आभार बाळासाहेब जाधव यांनी मानले.

# संगमनेरमध्ये रविवारी रंगणार 'वारी व्हेब्स' चा भक्तिमय सोहळा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आमदार अमोल खताळ पाटील यांच्या संकल्पनेतून रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत मालपाणी लॉन्स, संगमनेर येथे 'वारी व्हेब्स' या संकल्पनेवर आधारित भव्य भक्तिमय व सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवसेना महायुतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून जुन्या पिढीतील आजोबा आणि आजच्या तरुण पिढीचा संवाद घडवून आणत वारकरी परंपरा, संस्कृती आणि आधुनिक मनोरंजनाचा अनोखा मेळ साधला जाणार आहे.वारी व्हेब्स' या संकल्पनेतून नव्या पिढीला महाराष्ट्र च्या समृद्ध भक्ती आणि सांस्कृतिक परंपरेची ओळख करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पंढरी च्या विठ्ठलाची भक्तिगीते, वारकरी संप्रदायातील अभंग, देवीचा गोंधळ, खंडोबाचा गोंधळ, भारुड तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित पोवाडे अशा विविध भक्तिमय आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी संगमनेरकरांना अनुभवता येणार आहे. या कार्यक्रमात भूषण लुंगसे, कृष्णा जाधव, ज्ञानेश्वर झुरळे यांच्यासह शेकडो कलाकार आपले कलागुणांचे सादरीकरण करणार आहेत. त्यामुळे तब्बल तीन तास चालणाऱ्या या सोहळ्यात भक्ती, लोककला, महाराष्ट्राची संस्कृती आणि मनोरंजनाचा रंगतदार अनुभव उपस्थितांना घेता येणार आहे. आजच्या डिजिटल युगातील तरुणाईला आपल्या संतपरंपरेशी आणि महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीशी जोडण्याच्या उद्देशाने 'वारी व्हेब्स' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. आजोबांच्या काळातील वारी, अभंग, भारुड आणि लोककलेची परंपरा आजच्या तरुणाईपर्यंत पोहोचविण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने भक्ती, परंपरा आणि मनोरंजनाचा अनोखा संगम अनुभवण्याची संधी मिळणार असून, मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन शिवसेना महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पावसाने विहीर खचली

## शेतकऱ्याचे १५ लाखांचे नुकसान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील येथे संततधार पावसामुळे शेतकरी महादू आनंदा खेडकर यांची ६५ फूट खोल विहीर खचून सुमारे १५ लाख रुपयांचे प्रचंड नुकसान झाले आहे. विहिरीचे काँक्रीटचे बांधकाम ढासळल्याने ती पूर्णपणे बुजली असून, त्यात सुरू असलेला मत्स्यव्यवसायही उद्ध्वस्त झाला आहे. त्यामुळे खेडकर यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले असून, प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून भरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

गट नंबर ५२३/४/२ मध्ये ही विहीर आहे. सुरुवातीला ३० फूट खोल असलेल्या या विहिरीचे खेडकर यांनी २०१६ मध्ये पदरमोड करून खोलीकरण केले होते. सुमारे ४५ फुटांपर्यंत सिमेंट काँक्रीटीकरण (कड) करून विहिरीची एकूण खोली ६५ फूट आणि रुंदी २१ फूट करण्यात आली होती. शेतीला बारमाही पाणी मिळावे या हेतूने वर्षानुवर्षांची मेहनत आणि मोठी पुंजी लावून ही विहीर तयार केली होती; मात्र पावसाच्या रिपरिपिने सर्व काही मातीमोल केले. सततच्या पावसामुळे विहिरीभोवतालची माती खचली आणि सिमेंट काँक्रीटीकरणाचे भक्कम बांधकाम पत्त्याच्या बंगल्यासारखे कोसळले. या भीषण दुर्घटनेमुळे विहिरीचा आकार अंडाकृती झाला असून त्यात ढिगारा साचला आहे. गाळ व पालापाचोळा साचल्याने पाणी पांढरे पडले असून विहीर पूर्णपणे बुजली आहे. यामुळे खेडकर यांच्यासमोर शेतीच्या सिंचनाचा गंभीर प्रश्ने उभा राहिला आहे.शेतीला जोडधंदा म्हणून खेडकर यांनी विहिरीत कटला, कोंबडा आणि चिलापी प्रजातींच्या सुमारे दोन हजार माशांची पिल्ले सोडली होती. माशांची वाढ उत्तम झाली होती आणि त्यातून चांगले उत्पन्न मिळण्याची आस होती. परंतु, विहीर खचल्याने बहुतांश मासे ढिगाऱ्याखाली गाडले गेले आहेत. दूषित पाण्यामुळे उर्वरित माशांचाही नायनाट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# श्री श्री रविशंकर विद्या मंदिर संगमनेर येथे विद्यार्थी नेतृत्वाची नवी धुरा; शपथविधी सोहळा उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सुमेरू एज्युकेशन संचालित श्री श्री रविशंकर विद्या मंदिर, संगमनेर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीच्या विद्यार्थी मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा ६ ऑगस्ट रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. नव्याने निवडून आलेल्या विद्यार्थी प्रतिनिधींना नेतृत्वाची जबाबदारी औपचारिकपणे सोपविण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या प्राचार्या सौ. आरती सप्रा तसेच शिक्षक समन्वयक यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. ज्ञान, प्रज्ञा आणि संस्कारांचे प्रतीक असलेल्या दीपप्रज्वलनानंतर विद्यार्थी परिषद सदस्यांना पदचिन्हे (बॅच) प्रदान करण्यात आली. यानंतर विद्यार्थी प्रतिनिधींनी प्रामाणिकपणा, शिस्त, करुणा आणि निःस्वार्थ सेवेच्या मूल्यांचे पालन करत शाळेचे नेतृत्व करण्याची शपथ घेतली. यावेळी उपस्थितांनी नव्या नेतृत्वाचे टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.

यंदाच्या विद्यार्थी परिषदेमध्ये मुख्य विद्यार्थी (**Head Boy**) म्हणून अर्णव सुशांत क्षीरसागर, मुख्य विद्यार्थिनी (Head Girl) म्हणून समृद्धी संतोष मंडलिक, क्रीडा प्रमुख म्हणून सानवी किरण राऊत आणि सांस्कृतिक प्रमुख म्हणून स्वरा सुधाकर पानसरे यांची निवड करण्यात आली.

तसेच मुक्ती हाऊसचे कर्णधार शाश्वत चिंतन शहा, तृप्ती हाऊसच्या कर्णधार समीक्षा रक्षित शहा, शक्ती हाऊसचे कर्णधार गौरव अशोक सावंत आणि युक्ती हाऊसचे कर्णधार अनंघय मिलिंद आंबरे यांची नियुक्ती करण्यात आली. या विद्यार्थ्यांची निवड त्यांची गुणवत्ता, त्यांच्यातील नेतृत्व गुण यावर केली जाते. तसेच ही निवड एका शैक्षणिक वर्षाकरिता करण्यात येते. या उपक्रमामागील प्रमुख हेतू विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची भावना, संघभावना, निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास विकसित करणे हा आहे. शालेय जीवनातच लोकशाही मूल्ये, कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि सेवाभाव यांचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजावेत तसेच त्यांना विविध जबाबदाऱ्या पार पाडण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, यासाठी अशा शपथविधी सोहळ्यांचे आयोजन

विद्यालयात नेहमीच करण्यात येते. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. तसेच देशातील निवड प्रक्रिया समजुन घेऊन त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गुणांची पूर्तता विद्यार्थ्यांमध्ये होऊन भविष्यात सक्षम , संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडविण्यासाठी यासारखे व्यासपीठ अत्यंत उपयुक्त ठरते. संस्थापिका सौ. स्वाती शाह आणि सचिव श्री. समीर शाह यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम नेहमीच राबविण्यात येतात. विद्यार्थी नेतृत्वाला प्रोत्साहन देत त्यांच्यामध्ये जबाबदारी, सेवाभाव आणि आत्मविश्वास निर्माण करण्याच्या या प्रयत्नांचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन इयत्ता आठवीतील अर्णा ओझा आणि दिया डागा यांनी आत्मविश्वासपूर्ण व ओघवत्या शैलीत केले. यावेळी प्राचार्या सौ. आरती सप्रा यांनी नव्या विद्यार्थी नेतृत्वाचे अभिनंदन करत, खरे नेतृत्व हे पद किंवा सन्मानात नसून सेवा, प्रामाणिकपणा आणि जबाबदारीत असते. विद्यार्थी परिषद शाळेच्या मूल्यांचा वारसा जपत उत्कृष्ट नेतृत्व करेल, असा विश्वास आहे, असे सांगितले.

# मालपाणी विद्यालयात 'हर घर तिरंगा' उपक्रमाची उत्साहाने सुरुवात

## क्रांती दिन व आदिवासी दिनाचाही जागर



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शारदा शिक्षण संस्थेच्या मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयाच्या प्राथमिक विभागात 'हर घर तिरंगा' उपक्रमाची उत्साहात सुरुवात करण्यात आली. 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने भारत सरकारतर्फे आयोजित 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत दिनांक ८ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधीत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

याच पार्श्वभूमीवर क्रांती दिन व जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधत देशभक्तीचा जागर आणि आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविणारा आगळावेगळा कार्यक्रम विद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महान आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा तसेच स्वातंत्र्यसेनानी भगतसिंग व राजगुरू यांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांच्या त्याग, शौर्य आणि राष्ट्रकार्याला अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविकात सौ. कल्पना शिंदे यांनी विद्यार्थ्यांना क्रांती दिनाचा इतिहास, स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांचे योगदान तसेच जागतिक आदिवासी दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. क्रांती दिनानिमित्त इयत्ता चौथीच्या विद्यार्थिनींनी देशभक्तिपर समूहगीत सादर करून वातावरणात राष्ट्रप्रेमाची भावना जागवली. विद्यार्थ्यांनी स्फूर्तिदायी भाषणांमधून स्वातंत्र्यवीरांच्या त्याग, शौर्य आणि राष्ट्रनिष्ठेचे स्मरण केले.

आदिवासी दिनानिमित्त कार्यक्रमाला आदिवासी संस्कृतीचे मनोहारी रंग लाभले. पारंपरिक आदिवासी वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. आदिवासी गीताच्या तालावर विद्यार्थिनींनी सादर केलेल्या बहारदार नृत्याला उत्स्फूर्त दाद मिळाली. विशेष म्हणजे विद्यार्थिनींच्या नृत्याच्या तालावर पालक आणि शिक्षकांनीही ठेका धरल्याने संपूर्ण परिसर उत्साहाने भारावून गेला.

केवळ मनोरंजनापुरता हा उपक्रम मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांना आदिवासी समाजाची संस्कृती, परंपरा आणि वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषा यांची ओळख करून देण्यात आली. त्यामुळे देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास जाणून घेण्याबरोबरच भारताच्या समृद्ध सांस्कृतिक विविधतेची ओळख विद्यार्थ्यांना अनुभवातून झाली. कार्यक्रमास मुख्याध्यापिका श्रीमती सुनिता पवार, ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती वर्षा भडांगे तसेच पालक प्रतिनिधी सौ. पूजा टिपरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सौ. कल्पना शिंदे, सौ. जनाबाई गाडेकर, सौ. अर्चना दारोळे व सौ. मोहिनी शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने हा अभिनव उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

शारदा शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी, सेक्रेटरी सतीशजी लाहोटी, मुख्याध्यापिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाचे आणि या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक केले.

# गणपतराव जगताप यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी बु. (ता. संगमनेर) येथील सामाजिक व धार्मिक क्षेत्रात सक्रिय कार्य करणारे तसेच भारतीय हवाई दलात वारंट ऑफिसर म्हणून दीर्घकाळ देशसेवा बजावलेले सेवानिवृत्त गणपत मारुतराव जगताप (वय ६४) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने दोन्ही आश्वी गावांसह परिसरात हळहळ व्यक्त होत असून, देशसेवा व समाजसेवेचा संगम जपणारे कर्तव्यनिष्ठ व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

भारतीय हवाई दलात वारंट ऑफिसर म्हणून राष्ट्रसेवेची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडल्यानंतर त्यांनी गावातील सामाजिक व धार्मिक कार्यात स्वतःला झोकून दिले. सप्तश्रृंगी माता नवरात्रोत्सव, हनुमान अखंड हरिनाम सप्ताह, हनुमान चालीसा, रामनवमी उत्सव तसेच विविध धार्मिक उपक्रमांमध्ये त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग असे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, भावजया, दोन मुले, सुना, पुतणे व नातवंडे असा मोठा परिवार आहे. येथील विवेक जगताप व हितेश जगताप यांचे ते वडील होत. तसेच ते आश्वी खुर्द येथील सोनवणे परिवाराचे जावई असून रमेश (कैलास) सोनवणे यांचे मेव्हणे होते. अंत्यसंस्कारावेळी परिसरातील सुमारे २० माजी सैनिकांनी उपस्थित राहून पुष्पचक्र अर्पण केले. त्यानंतर मानवंदन सॅल्यूट देत आपल्या सहकाऱ्याला भावपूर्ण मानवंदना अर्पण करून अखेरचा निरोप दिला. या प्रसंगी उपस्थित ग्रामस्थांचे डोळे पाणावले.

# संपादकीय...

## जागतिक आदिवासी दिन

# निसर्गाशी नाते जपणाऱ्या संस्कृतीचा गौरव

दरवर्षी ९ ऑगस्ट हा दिवस जगभरात 'जागतिक आदिवासी दिन' (खपींशीपरींळेपरश्र ऊरूेष ींहश थेीश्रव'ी खपवळसशर्पेीी झशेश्रिशी) म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने १९९४ पासून या दिवसाची सुरुवात केली. या दिनाचा उद्देश जगभरातील आदिवासी समाजाचे हक्क, त्यांची संस्कृती, भाषा, परंपरा आणि त्यांच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत जागरूकता निर्माण करणे हा आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात आदिवासी समाज हा सांस्कृतिक वारशाचा महत्त्वाचा भाग असून त्यांच्या जीवनपद्धतीत निसर्गाशी असलेले अतूट नाते आजच्या आधुनिक जगासाठी प्रेरणादायी आहे. भारतात सुमारे १० कोटींहून अधिक आदिवासी नागरिक राहतात. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, झारखंड, छत्तीसगड, ओडिशा, राजस्थान आणि ईशान्य भारतातील अनेक राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर आदिवासी समाजाचे वास्तव्य आहे. महाराष्ट्रात भिल्ल, महादेव कोळी, वारली, ठाकूर, कातकरी, गोंड, कोकणा, कोरकू अशा अनेक आदिवासी जमाती आहेत. प्रत्येक जमातीची स्वतंत्र भाषा, लोककला, नृत्य, सण-उत्सव आणि जीवनशैली आहे. आदिवासी समाजाचा सर्वात मोठा गुण म्हणजे निसर्गाशी असलेली एकरूपता. जंगल, डोंगर, नद्या आणि वनसंपदा यांचे जतन करत त्यांनी शतकानुशतके पर्यावरणाचा समतोल राखला आहे. जंगलातील औषधी वनस्पतींचे ज्ञान, सेंद्रिय शेतीच्या पद्धती, जलसंधारणाचे पारंपरिक उपाय आणि जैवविविधतेचे संरक्षण यामध्ये आदिवासी समाजाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. आज हवामान बदल आणि पर्यावरणीय संकटाच्या काळात त्यांच्या जीवनशैलीकडून संपूर्ण जगाला शिकण्यासारखे बरेच काही आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही आदिवासी वीरांचे योगदान मोठे आहे. बिरसा मुंडा, राघोजी भांगरे, तंट्या भिल्ल, गोविंद गुरु, अल्लुरी सीताराम राजू यांसारख्या अनेक आदिवासी क्रांतिकारकांनी अन्यायाविरुद्ध संघर्ष करत स्वातंत्र्याची मशाल पेटती ठेवली. त्यांच्या शौर्याची आणि बलिदानाची प्रेरणा आजही देशवासीयांना मार्गदर्शक ठरते. सांस्कृतिकदृष्ट्याही आदिवासी समाज अत्यंत समृद्ध आहे. वारली चित्रकला, लोकनृत्य, पारंपरिक वाद्ये, लोकगीते आणि हस्तकला यांना देश-विदेशात विशेष मान्यता मिळाली आहे. त्यांच्या कलाकृतींमध्ये निसर्ग, श्रम, कुटुंबव्यवस्था आणि सामाजिक ऐक्याचे सुंदर दर्शन घडते. आज या कलांना बाजारपेठ उपलब्ध होत असली तरी अनेक कलाकारांना योग्य मोबदला आणि प्रोत्साहन मिळणे आवश्यक आहे. मात्र, विकासाच्या प्रवाहात आदिवासी समाजाला अनेक आव्हानांनाही सामोरे जावे लागत आहे. शिक्षणाचा अभाव, आरोग्य सुविधा, रोजगाराच्या मर्यादित संधी, कुपोषण, स्थलांतर, वनहक्कांचे प्रश्न आणि मूलभूत सुविधांची कमतरता ही अनेक भागांतील वास्तव परिस्थिती आहे. आधुनिक विकासाच्या नावाखाली अनेक वेळा आदिवासींचे विस्थापन झाले असून त्यांच्या पारंपरिक जीवनशैलीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे विकास करताना त्यांच्या हक्कांचे आणि संस्कृतीचे संरक्षण करणे तितकेच आवश्यक आहे. शासनाकडून शिक्षण, आरोग्य, रोजगार, वनहक्क, महिला सक्षमीकरण आणि आर्थिक विकासासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. वनहक्क कायदा, एकलव्य मॉडेल निवासी शाळा, आदिवासी विकास महामंडळाच्या योजना आणि कौशल्य विकास उपक्रमांमुळे अनेक तरुणांना नवीन संधी उपलब्ध होत आहेत. मात्र, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि दुर्गम भागांपर्यंत पोहोच ही काळाची गरज आहे. आज अनेक आदिवासी युवक-युवती शिक्षण, प्रशासन, क्रीडा, कला, उद्योग आणि संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवत आहेत. हे बदल सकारात्मक असले तरी त्याचवेळी त्यांच्या मातृभाषा, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक ओळख जपण्याची जबाबदारीही समाजाची आहे. विकास आणि परंपरा यांचा समतोल राखणे हीच खरी प्रगती ठरेल. जागतिक आदिवासी दिन हा केवळ उत्सव साजरा करण्याचा दिवस नाही, तर आदिवासी समाजाच्या संघर्षाची, योगदानाची आणि त्यांच्या हक्कांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी आहे. आदिवासी समाज हा केवळ भारताचा नव्हे, तर संपूर्ण मानवजातीच्या सांस्कृतिक आणि पर्यावरणीय वारशाचा अमूल्य ठेवा आहे. त्यांचे ज्ञान, परंपरा आणि निसर्गप्रेम जपणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आजच्या पिढीने आदिवासी समाजाकडे केवळ मागासवर्ग म्हणून न पाहता, पर्यावरण संवर्धन, सामाजिक समता आणि शाश्वत विकासाचे खरे मार्गदर्शक म्हणून पाहण्याची गरज आहे. त्यांच्या संस्कृतीचा सन्मान, हक्कांचे संरक्षण आणि सर्वसमावेशक विकास यांमधूनच खऱ्या अर्थाने समृद्ध, संवेदनशील आणि समताधिष्ठित भारताची निर्मिती होईल.

# बी. व्ही. नागरत्ना ठरणार देशाच्या पहिल्या महिला सरन्यायधीश



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

भारतीय न्यायपालिकेच्या इतिहासात लवकरच नवे पर्व सुरू होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना सप्टेंबर २०२७ मध्ये भारताच्या पहिल्या महिला सरन्यायाधीश (उगख) म्हणून पदभार स्वीकारणार आहेत. त्या देशाच्या ५५व्या सरन्यायाधीश असतील. त्यांचा कार्यकाळ अवघा ३६ दिवसांचा असणार असला, तरी देशाच्या न्यायव्यवस्थेतील या ऐतिहासिक नियुक्तीचे महत्त्व मोठे आहे.

कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी संसदेत दिलेल्या माहितीनंतर न्यायमूर्ती नागरत्ना यांच्या आगामी नियुक्तीची चर्चा सुरू झाली. विशेष म्हणजे त्यांचे वडील न्यायमूर्ती ई. एस. व्यंकटरमैया हे १९८९ मध्ये भारताचे १९वे सरन्यायाधीश होते. त्यामुळे वडिलांनंतर सर्वोच्च न्यायालयाच्या सर्वोच्च पदावर पोहोचणाऱ्या त्या एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक उदाहरण ठरणार आहेत. न्यायमूर्ती नागरत्ना यांनी आपल्या न्यायिक कारकिर्दीत अनेक महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये स्वतंत्र आणि ठाम भूमिका घेतली आहे. २०१६च्या नोटबंदीच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या प्रकरणात घटनापीठातील त्या एकमेव न्यायाधीश होत्या, ज्यांनी केंद्राचा निर्णय बेकायदेशीर असल्याचे मत नोंदवले होते. बिल्किस बानो प्रकरणातील ११ दोषींच्या मुदतपूर्व सुटकेचा निर्णय रद्द करणाऱ्या खंडपीठाचाही त्या भाग होत्या. संबंधित सरकारला असा निर्णय घेण्याचा अधिकार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

२०२३ मधील मंत्र्यांच्या वक्तव्यांशी संबंधित प्रकरणातही त्यांनी बहुमताच्या निर्णयापेक्षा वेगळे मत मांडले. सरकारी धोरणाचा भाग म्हणून एखाद्या मंत्र्याने आक्षेपार्ह वक्तव्य केले असल्यास काही परिस्थितींमध्ये सरकारची जबाबदारी निश्चित होऊ शकते, अशी भूमिका त्यांनी घेतली. लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक पदाची प्रतिष्ठा लक्षात घेऊन आत्मसंयम बाळगावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. महिलांच्या अधिकारांबाबतही न्यायमूर्ती नागरत्ना यांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे. २०२२च्या गर्भपातासंदर्भातील ऐतिहासिक निर्णयात विवाहित आणि अविवाहित महिलांमध्ये केवळ वैवाहिक स्थितीच्या आधारावर भेदभाव करता येणार नाही, हे न्यायालयाने स्पष्ट केले.

# आदिवासी दिनाचा अनावश्यक खर्च टाळून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - आदिवासी दिना निमित्त विविध कार्यक्रमांवर होणारा अनावश्यक खर्च टाळून तोच निधी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी वापरण्याचा उपक्रम सामजिक कार्यकर्ते सचिन देशमुख व मित्रपरिवाराच्या वतीने राबविण्यात आला. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शालेय बॅग व खाऊचे वाटप करून जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देशमुखवाडी येथील विद्यार्थ्यांना शालेय बॅग व खाऊचे वाटप करण्यात आले.

आदिवासी दिनानिमित्त बँड-बाजा, वाजंत्री व अनावश्यक खर्च न करता विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी प्रत्यक्ष मदत करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देऊन त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे हा उद्देश होता

या वेळी माजी सरपंच गणपतराव देशमुख, कशोर देशमुख, अक्षय देशमुख, पोपट चौधरी, सुनील लोखंडे, युवराज मुंडे, पांडुरंग लेंडे, शिवाजी देशमुख, भाऊराव देशमुख, साहिल पठाण, करण देशमुख यांच्यासह संबंधित शाळांतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, समाजबांधव व ग्रामस्थ उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि शिक्षणासाठी मिळालेली मदत यामुळे हा उपक्रम उपस्थितांच्या कौतुकाचा विषय ठरला. आदिवासी दिन हा केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि भविष्यासाठी योगदान देण्याची गरज आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# अबॅकस स्पर्धेत विद्यार्थ्यांची चमक




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आरंभ व्हिजन बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने संगमनेर येथील शारदा लॉन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय अबॅकस व वैदिक गणित स्पर्धेला विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. राजूर, अकोले, संगमनेर, संभाजीनगर, नांदेड आणि नाशिक येथील सुमारे १५० विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदवून आपल्या बौद्धिक क्षमतेचा उत्कृष्ट आविष्कार घडविला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आ. डॉ. किरणजी लहामटे तर अध्यक्ष म्हणून संगमनेर नगरपालिकाचे माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे होते.आ. डॉ.लहामटे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत, अबॅकस आणि वैदिक गणितामुळे विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती, एकाग्रता, निर्णयक्षमता आणि गणितीय विचारशक्ती विकसित होत असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अशा राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठांची गरज असून आरंभ व्हिजन संस्थेचा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे यांनी मार्गदर्शन करताना, आजच्या स्पर्धात्मक युगात अबॅकस हे केवळ विद्यार्थ्यांसाठी नव्हे, तर प्रत्येकासाठी उपयुक्त ज्ञान आहे. वेगवान आणि अचूक विचार करण्याची क्षमता विकसित करण्यासाठी अशा प्रशिक्षणाची आवश्यकता आहे, यावेळी कविवर्य सुभाष सोनवणे, वधू-वर समितीचे प्रदेशाध्यक्ष रामदासजी सोनवणे यांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत आरंभ व्हिजनच्या अध्यक्षा कावेरी घोलप व संस्थेच्या कार्याचे विशेष कौतुक केले. स्पर्धेतील वैदिक गणित गटात तनिष्का किशोर येलमामे हिने प्रथम क्रमांक पटकावत सायकल हे आकर्षक बक्षीस मिळविले. साई रमेश कानकाटे याने द्वितीय क्रमांक, तर निशांत साबळे आणि ओमकार भांगरे यांनी संयुक्त तृतीय क्रमांक मिळविला. फ्री बेसिक गटात अन्वेषा दत्तात्रय चोथवे हिने प्रथम क्रमांक समीर तांबोळी याने द्वितीय, तर विहान पुष्कर सोनार याने तृतीय क्रमांक मिळविला. अबॅकस ज्युनिअर गटात संस्कृती चोथवे हिने प्रथम क्रमांक, मेहेक गबाले हिने द्वितीय, कस्तुरी नवनाथ साबळे हिने तृतीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

# जिल्ह्यात ७२ हजार शेतकऱ्यांना ६९७ कोटी रुपयांचा दिलासा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'चा राज्यातील पहिला टप्पा ऑनलाइन पद्धतीने पार पडला. मुंबईतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लाभाचे वितरण करण्यात आले. यात अहिल्यानगर जिल्ह्याने बाजी मारली असून, ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी ८१ लाख रुपयांहून अधिक निधी वर्ग करण्यात आला आहे. या योजनेच्या आधार प्रमाणीकरणात अहिल्यानगर जिल्हा राज्यात अव्वल ठरला आहे. कर्जमुक्ती मिळालेल्यांमध्ये अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ६५ हजार ६५६ शेतकऱ्यांना ६२२ कोटी ७४ लाख जिल्ह्यात रुपये, तर राष्ट्रीयकृत बँकांमधील ६ हजार ९०३ शेतकऱ्यांना ७५ कोटी ७लाखांचा लाभ मिळाला आहे, अशी माहिती पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे यांनी दिली. प्यासनाने सर्व बँकांना पात्र शेतकऱ्यांना नवीन खरीप पीककर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. एकूण २ लाख ३३ हजार ७११ शेतकरी खातेदारांची नोंद पोर्टलवर झाली आहे. पहिल्या टप्प्यात १ लाख ३२ हजार ५९१ पात्र शेतकऱ्यांचा समावेश आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी उर्वरित शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. तसेच ८ हजार ३६३ शेतकऱ्यांनी त्वरित 'फार्मर आयडी' काढून घ्यावा, असे आवाहन केले आहे.

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME IS
JUBEDA BINTE KASAM KHA

MY NEW NAME IS
JUBEDA KASAMKHAN PATHAN

ADD:- ALKA NAGAR
SANGAMNER- 422605
DIST - AHILYANAGAR

**पाहिजेत**

श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५९

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com
क्र. कावी/ जन्म नोंद/५८७/२०२६
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
दिनांक - २९/०७/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. आप्पासाहेब नाना शिंदे, रा. कनकापूर ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक २०/०७/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. कनकापूर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची मुलगा नामे संजोग आप्पासाहेब शिंदे यांचा **जन्म मौजे कनकापूर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक** ०२/१०/१९८५ रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**त्वरित भरती आजच संधीचा लाभ घ्या**

सर्व्हिस अॅडव्हायझर – 01 जागा
शैक्षणिक पात्रता :- ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल डिप्लोमा
अनुभव :- फ्रेशर किंवा कोणत्याही ऑटोमोबाईल शोरूममध्ये १ वर्षाचा अनुभव असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

स्पेअर पार्ट्स बिलिंग – 01 जागा
कोणत्याही ऑटोमोबाईल शोरूममध्ये स्पेअर पार्ट्स बिलिंगचा किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक.

इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा.
पत्ता - घुलेवाडी ता. संगमनेर, जि. अ.नगर
मो. ९४२२७३५५६४

**पाहिजेत**

एक पुरुष कर्मचारी/मुलगा
पात्रता - लिहिता वाचता येणे आवश्यक
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल
नवीन नगर रोड संगमनेर
– संपर्क –
7972999316

**फ्लॅट विकणे आहे**

2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

**फॅकल्टी पाहिजे** अगस्ती अकॅडमी संगमनेर

ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
AMVI – 461 जागा MPSC (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू
MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा
अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
6005401510
9209645727







# तीन दशकांचे रेल्वे स्वप्न सत्यात उतरवणारच

## संगमनेर-अकोलेला वगळून पुणे-नाशिक रेल्वेचा मार्ग गेला शिर्डीकडे; राजकीय कुरघोडी की तांत्रिक अडथळा?

## तीनदा बदलला डीपीआर; भूसंपादनानंतरही जुना मार्ग गुंडाळला - 'जीएमआरटी'च्या आक्षेपांचे अडसर नको




संगमनेर - मागील तीन दशकांपासून संगमनेरमधून 'झुकझुक आगीनगाडी' धावावी, हे स्वप्न उराशी बाळगून असलेल्या संगमनेरकरांच्या आशेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पुणे-नाशिक या दोन महत्त्वाच्या औद्योगिक शहरांना जोडणाऱ्या सेमी हायस्पीड रेल्वे मार्गामुळे संगमनेर आणि अकोले तालुक्याचा विकासाचा वेग झपाट्याने वाढेल, अशी अपेक्षा निर्माण झाली होती. पहिल्या दोन डीपीआरमध्ये संगमनेर आणि देवठाण (अकोले) ही स्थानके कायम ठेवण्यात आली, सर्वेक्षण झाले, भूसंपादनाची प्रक्रियाही पुढे गेली आणि काही शेतकऱ्यांना मोबदला देखील मिळाला. मात्र, आता तिसऱ्या डीपीआरमध्ये संपूर्ण मार्गच बदलून पुणे-अहिल्यानगर-शिर्डी-सिन्नर-नाशिक असा करण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. त्यामुळे संगमनेर-अकोलेच्या वाट्याला पुन्हा प्रतीक्षाच येणार का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**पहिला डीपीआर :**

संगमनेर-अकोलेला विकासाची थेट जोडणी- पुणे आणि नाशिक या दोन वेगाने विकसित होणाऱ्या औद्योगिक शहरांना जोडण्यासाठी २०१७-१८ मध्ये तयार करण्यात आलेल्या पहिल्या डीपीआरमध्ये पुणे-चाकण-नारायणगाव-संगमनेर-सिन्नर-नाशिक असा थेट आणि तुलनेने कमी अंतराचा मार्ग प्रस्तावित करण्यात आला होता. या मार्गाची लांबी सुमारे २३५ किलोमीटर होती. पुणे, हडपसर, मांजरी, वाघोली, आळंदी, चाकण, राजगुरुनगर, मंचर, नारायणगाव, आळेफाटा, संगमनेर, देवठाण (अकोले), सिन्नर आणि नाशिक अशी प्रमुख स्थानके प्रस्तावित होती. या मार्गामुळे दूध, भाजीपाला, शेतीमाल, कापड आणि इतर उद्योगांना पुणे-मुंबई तसेच नाशिकच्या बाजारपेठेशी जलद संपर्क मिळाला असता. त्याचबरोबर पुणे आणि नाशिकमधील शिक्षण, रोजगार व उद्योगांच्या संधी संगमनेर-अकोलेच्या तरुणांसाठी अधिक जवळ आल्या असत्या.

**दुसऱ्या डीपीआरमध्येही संगमनेर-अकोले कायम -**

त्यानंतर २०२१-२२ मध्ये मार्गाचा पुन्हा आराखडा करण्यात आला. तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी काही बदल करण्यात आले; मात्र या आराखड्यातही संगमनेर आणि देवठाण ही स्थानके कायम ठेवण्यात आली.

याच काळात सर्वेक्षण आणि जमिनीची मोजणी सुरू झाली. संगमनेर तालुक्यातील घारगाव परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनींच्या भूसंपादनाची प्रक्रिया पुढे गेली. या प्रक्रियेत सुमारे ३५० कोटी रुपयांचा मोबदला वितरित झाल्याचा दावा करण्यात येत आहे. म्हणजेच रेल्वे केवळ कागदावर नव्हती; ती प्रत्यक्ष जमिनीवर येण्याच्या दिशेने वाटचाल करत होती.

मग अचानक 'जीएमआरटी'चा अडथळा कसा? - नारायणगावजवळील खोडद येथील जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप अर्थात जीएमआरटीच्या संवेदनशील परिसरामुळे रेल्वेच्या सिग्नलमुळे दुर्बिणीच्या वैज्ञानिक निरीक्षणावर परिणाम होऊ शकतो, असा आक्षेप घेण्यात आला. त्यानंतर मार्गात काही बदल करण्यात आले.

**मात्र, याच मुद्द्यावर आता संगमनेर-अकोलेकरांचा मूलभूत प्रश्न आहे-**

पहिल्या दोन डीपीआरच्या वेळी जीएमआरटीचा संभाव्य अडथळा प्रशासनाच्या आणि संबंधित मंत्रालयांच्या लक्षात आला नव्हता का? जर तांत्रिक अडचण होती, तर त्यावर पर्यायी मार्ग काढता आला नसता का? आणि जर मार्ग बदलणे अपरिहार्य होते, तर भूसंपादन आणि सर्वेक्षणावर कोट्यवधी रुपये खर्च झाल्यानंतरच हा निर्णय का झाला? यामुळे या संपूर्ण प्रकरणामागे तांत्रिक अडचण आहे की राजकीय सोय-असोय, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे.

**तिसरा डीपीआर :**

**संगमनेर-अकोलेला थेट हद्दपार!**

२०२४-२५ मध्ये आता तिसरा डीपीआर समोर आला असून, जीएमआरटी तसेच संरक्षण विभागाच्या हरकतींवर कायमस्वरूपी तोडगा म्हणून मार्ग पूर्णपणे बदलण्याचा प्रस्ताव आहे.

**नवीन प्रस्तावित मार्ग-**

पुणे - चाकण - अहिल्यानगर - निंबळक - पुणतांबा - शिर्डी - सिन्नर - नाशिक या मार्गामुळे संगमनेर आणि अकोले हे दोन महत्त्वाचे तालुके अक्षरशः रेल्वेच्या नकाशाबाहेर जाणार आहेत. विशेष म्हणजे या बदलामुळे रेल्वे मार्गाची लांबी सुमारे ९० किलोमीटरने वाढणार असून प्रकल्पाच्या खर्चातही मोठी वाढ होणार आहे.

**ज्या शहरांना आधीच रेल्वे आहे, त्यांच्यासाठी नवा मार्ग; पण संगमनेर-अकोलेचे काय?**

अहिल्यानगर आणि शिर्डी या भागांना रेल्वेची सुविधा यापूर्वीपासूनच उपलब्ध आहे. त्यामुळे प्रस्तावित नव्या मार्गामुळे या शहरांना निश्चितच काही अतिरिक्त फायदा होऊ शकतो; मात्र संगमनेर आणि अकोलेसारख्या रेल्वेविहीन आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या तालुक्यांना या मार्गातून वगळल्यास त्यांचे मोठे नुकसान होणार आहे. पुणे आणि नाशिक ही महाराष्ट्रातील दोन महत्त्वाची औद्योगिक शहरे आहेत. मुंबई-पुणे-नाशिक हा महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा महत्त्वाचा पट्टा मानला जातो. या दोन शहरांना जलद रेल्वेने जोडताना मध्ये असलेल्या संगमनेरसारख्या विकसित तालुक्याला बाहेर ठेवणे म्हणजे विकासाच्या संधींपासून मोठ्या लोकसंख्येला दूर ठेवण्यासारखे आहे, अशी भावना व्यक्त होत आहे.

**संगमनेरचे व्यापारी भवितव्य धोक्यात-**

उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख व्यापारी केंद्र म्हणून संगमनेरची ओळख आहे. दूध व्यवसाय, कृषी उत्पादन, कापड व्यापार, बांधकाम व्यवसाय आणि विविध उद्योगांमुळे संगमनेरची अर्थव्यवस्था मजबूत आहे. रेल्वेची जोडणी मिळाल्यास पुणे, मुंबई आणि नाशिकच्या बाजारपेठांपर्यंत मालवाहतूक अधिक वेगाने आणि कमी खर्चात करता आली असती. रेल्वे आली असती तर संगमनेरच्या व्यापाराला नवे पंख मिळाले असते; आता मात्र ही संधी पुन्हा कित्येक दशके दूर जाण्याची भीती आहे.

**अकोल्याच्या पर्यटनालाही मोठा फटका**

अकोले तालुक्यातील भंडारदरा, कळसूबाई शिखर, हरिश्चंद्रगड, घाटघर आदी पर्यटनस्थळांना रेल्वेची जोडणी मिळाल्यास राज्याच्या विविध भागातून येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढली असती. देवठाण येथे प्रस्तावित रेल्वे स्थानक हे अकोलेच्या पर्यटनासाठी प्रवेशद्वार ठरू शकले असते. मात्र नवीन मार्गामुळे अकोले रेल्वेच्या नकाशावरूनच गायब झाल्यास पर्यटनविकासाची ही मोठी संधीही हातची जाण्याची शक्यता आहे.

**विद्यार्थी आणि चाकरमान्यांचा प्रवास कायम खडतर**

संगमनेर आणि अकोले तालुक्यातील हजारो विद्यार्थी पुणे आणि नाशिकमध्ये शिक्षणासाठी जातात. मोठ्या संख्येने नागरिक रोजगार, व्यवसाय आणि उद्योगांसाठीही या शहरांशी जोडलेले आहेत. आजही त्यांना रस्ते वाहतुकीवर अवलंबून राहावे लागते. वाहतूक कोंडी, वाढता प्रवास खर्च आणि वेळ यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. सेमी हायस्पीड रेल्वे मिळाली असती तर पुणे आणि नाशिक 'हाकेच्या अंतरावर' आले असते. मात्र नव्या मार्गामुळे ही संधी पुन्हा हातातून जाणार आहे.

**रेल्वेसाठी अनेक नेत्यांचा संघर्ष; तरीही मार्ग बदलतोय -**

पुणे-नाशिक रेल्वेसाठी सिन्नरचे तत्कालीन लोकप्रतिनिधी राजाभाऊ वाजे, मंत्री माणिकराव कोकाटे, संगमनेरचे माजी लोकप्रतिनिधी बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजित तांबे, आमदार अमोल खताळ, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार डॉ. किरण लहामटे, पुणे जिल्ह्यातील नेते शिवाजीराव आढळराव पाटील, खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार शरद सोनवणे, आमदार अतुल बेणके, खासदार निलेश लंके यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधींनी विविध टप्प्यांवर प्रयत्न केले आहेत. संगमनेर-अकोलेतील नागरिकांनीही रेल्वे कृती समितीच्या माध्यमातून आंदोलनाची भूमिका घेतली आहे. मात्र एकीकडे लोकप्रतिनिधी रेल्वेसाठी संघर्ष करत असताना दुसरीकडे डीपीआरच बदलत राहणार असतील, तर जनतेने नेमके कोणावर विश्वास ठेवायचा? हा प्रश्न आता अधिक तीव्र झाला आहे.

**रेल्वे मंत्र्यांचे आश्वासन; संभ्रम मात्र कायम-**

नवीन मार्गाचा डीपीआर मध्य रेल्वेकडून अंतिम करण्यात आल्याचे सांगितले जात असून तो रेल्वे बोर्डाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. दुसरीकडे संगमनेर-अकोलेकरांच्या आंदोलनामुळे या प्रश्नाला पुन्हा राजकीय आणि प्रशासकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी रेल्वे मंत्र्यांची भेट घेतल्यानंतर मार्गाबाबत पुन्हा विचार करण्याचे आश्वासन मिळाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे रेल्वे नेमकी कोणत्या मार्गाने धावणार, याबाबतचा संभ्रम अद्याप कायम आहे.

**'राजकीय कुरघोडीपेक्षा जनतेचे स्वप्न मोठे!' -**

संगमनेरला रेल्वे मिळावी ही मागणी आजची नाही. तब्बल तीन दशकांपासून ही मागणी केली जात आहे. या मागणीसाठी अनेक लोकप्रतिनिधींनी प्रयत्न केले. रेल्वेचे कार्यालय सुरू झाले, सर्वेक्षण झाले, भूसंपादन झाले आणि कोट्यवधी रुपयांची प्रक्रिया पार पडली.

**मग अचानक मार्ग बदलला.**

जर जीएमआरटी हा तांत्रिक अडथळा असेल, तर त्यावर शास्त्रीय आणि तांत्रिक तोडगा काढला पाहिजे. पर्यायी मार्ग शक्य नसेल तर त्याची कारणे जनतेसमोर पारदर्शकपणे मांडली पाहिजेत. मात्र केवळ एका कारणाचा आधार घेत संगमनेर-अकोलेला विकासाच्या या महत्त्वाच्या प्रकल्पातून वगळले जात असेल, तर त्यामागचे खरे कारण काय, हा प्रश्न अनुत्तरित राहणार आहे.

राजकीय नेत्यांनी स्वतःचे राजकीय महत्त्व वाढविण्यासाठी अथवा एकमेकांचे महत्त्व कमी करण्यासाठी या प्रकल्पाचे राजकारण करू नये. पुणे-नाशिक रेल्वे लवकरात लवकर आणि सर्वाधिक व्यवहार्य मार्गाने पूर्ण करणे, हेच जनतेच्या हिताचे आहे. कारण आज संगमनेर-अकोलेला रेल्वेपासून वंचित ठेवले, तर हा प्रकल्प पुन्हा या तालुक्यांच्या दारात येण्यासाठी किती दशके लागतील, याची शाश्वती नाही.

संगमनेरला विमानतळापेक्षा आधी रेल्वे हवी आहे, ही जनतेची मागणी आहे. ती मागणी आता पुन्हा एकदा रुळावर आणण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधी, राज्य सरकार आणि केंद्र सरकारची आहे. अन्यथा तीन दशकांपासून पाहिलेले 'संगमनेरमधून धावणाऱ्या झुकझुक आगीनगाडीचे स्वप्न' हे स्वप्नच राहील आणि पुढील पिढीलाही त्याच स्वप्नाची प्रतीक्षा करावी लागेल.

**किसन भाऊ हासे**
**शब्दांकन- संजय नामदेव आहिरे**
**उपसंपादक, दैनिक युवावार्ता**

## सेमी हायस्पीड रेल्वेची वैशिष्ट्ये –

**या प्रकल्पाची संकल्पना अत्यंत महत्त्वाकांक्षी असून–**
**वेग क्षमता : सुमारे २०० किमी, प्रतितास पुणे–नाशिक प्रवास : सुमारे २ तास,**
**प्रस्तावित स्थानके : २४, बोगदे : १८, अंदाजे प्रकल्प खर्च : १६,०३९ कोटी रुपये**
**पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यांना जोडणारा प्रकल्प**
**विद्युतीकरणासह रेल्वे मार्ग विकसित करण्याचा प्रस्ताव**
**कंटेनर डेपो, मालवाहतूक टर्मिनल, ड्राय पोर्ट, मल्टीमोडल हब, गोदामे, साइडिंगची सुविधा**
**औद्योगिक मालाची जलद आणि किफायतशीर वाहतूक**
**रोजगार निर्मिती आणि औद्योगिक विकासाला चालना**

**अशा मोठ्या प्रकल्पाचा फायदा संगमनेर–अकोलेला मिळण्याची संधी**
**आता हातातून जाणार नाही यासाठी जनआंदोलनच हाच पर्याय महत्वाचा**



पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# आठ वर्षांपासून बंद असलेली पशुधन विमा योजना पुन्हा सुरू - आ. खताळ




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सन २०१५ मध्ये सुरू करण्यात आलेली आणि २०१८ पासून बंद असलेली पशुधन विमा योजना पुन्हा सुरू करण्याच्या आमदार अमोल खताळ यांच्या मागणीला अखेर यश आले आहे. महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत राज्यात 'पशुधन विमा योजना' पुन्हा राबविण्यास मंजुरी दिली असून, या निर्णयामुळे राज्यातील लाखो पशुपालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या अधिवेशनात आमदार अमोल खताळ यांनी हा मुद्दा प्रभावीपणे उपस्थित करत सभागृहाचे लक्ष वेधले होते. पिकविमा योजनेप्रमाणेच पशुधनासाठीही विमा संरक्षण उपलब्ध असणे गरजेचे असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले होते. पशुपालन हा अनेक शेतकरी कुटुंबांच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा आधार असल्याने पशुधनाचे आर्थिक संरक्षण करण्यासाठी ही योजना तातडीने सुरू करण्याची मागणी त्यांनी शासनाकडे केली होती.

विशेष म्हणजे, जवळपास आठ वर्षांपासून ही योजना बंद होती. या कालावधीत अनेक पशुपालकांना जनावरांच्या मृत्यूमुळे मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले. मात्र या महत्त्वाच्या प्रश्नाकडे फारसे लक्ष वेधले गेले नव्हते. सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून पुढे आलेले आमदार अमोल खताळ यांनी पशुपालकांच्या अडचणी आणि त्यांच्या समस्या लक्षात घेऊन हा विषय सातत्याने शासनाच्या निदर्शनास आणून दिला. त्यांच्या पाठपुराव्याची दखल घेत शासनाने अखेर ही योजना पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या या योजनेत गाई, म्हशी, बैल, रेडे, शेळ्या आणि मेंढ्यांना विमा संरक्षण मिळणार आहे. हवामानातील बदल, नैसर्गिक आपत्ती, रोगराई, विषबाधा, सर्पदंश, दूषित पाण्यामुळे होणारे आजार, गंभीर अपघात तसेच विविध संसर्गजन्य आणि साथीच्या रोगांमुळे जनावरांचा मृत्यू झाल्यास पशुपालकांना आर्थिक नुकसानभरपाई मिळणार आहे. या निर्णयामुळे पशुपालकांना आर्थिक सुरक्षिततेचे कवच मिळणार असून, जनावरांच्या मृत्यूनंतर होणारा मोठा आर्थिक फटका कमी होण्यास मदत होणार आहे. पशुधनाचे संरक्षण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. दरम्यान, पशुधन विमा योजना पुन्हा सुरू झाल्याबद्दल पशुपालकांनी समाधान व्यक्त करत आमदार अमोल खताळ यांचे आभार मानले आहेत.

## मेडिकलचे शटर तोडून २० हजार लांबवले

संगमनेर : संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील समनापूर रोकडे कॉम्प्लेक्स शेजारी असलेल्या साईसेवा मेडिकलमध्ये अज्ञात चोरट्याने घरफोडी करून रोख रक्कम लांबवल्याची घडली घटना आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, समनापूर मानकुबाबा वस्ती येथील रहिवासी दत्तात्रय पांडुरंग शेरमाळे (वय २६ वर्ष, व्यवसायः शेती) यांनी दिलेल्या तक्रारीवरून संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिनांक ३ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री समनापूर रोकडे कॉम्प्लेक्स शेजारी असलेल्या साईसेवा मेडिकलचे बंद शटर अज्ञात चोरट्याने तोडले. त्यानंतर आत प्रवेश करून काउंटरच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवलेली २०,०००/- रुपयांची भारतीय चलनाची रोख रक्कम चोरून नेली. याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध घरफोडीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# दिल्ली नाक्यावर भरदिवसा राडा !

## प्रेमविवाह पडला महागात; नववधूचे अपहरण



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - प्रेमविवाह केल्याचा राग मनात धरून मुलीच्या नातेवाईकांनी भरदिवसा दिल्ली नाका परिसरात राडा घालत नवदाम्पत्यासह त्यांच्या मित्रांवर हॉकी स्टिक, लोखंडी रॉड आणि दगडाने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. हल्लेखोरांनी प्रियकराच्या चारचाकी वाहनाची मोठ्या प्रमाणात तोडफोड केली. तसेच नववधूला मारहाण व दमदाटी करून तिला जबरदस्तीने वाहनात बसवून लोणीच्या दिशेने घेऊन गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे दिल्ली नाका परिसरात मोठी खळबळ उडाली.

या प्रकरणी प्रियकर महेश बबन शिरसाठ (वय २४, रा. हसनपूर रोड, लोणी) यांच्या फिर्यादीवरून संगमनेर शहर पोलिसांनी जगदीश आहेर, आर्यन आहेर, दर्शन आहेर, तेजस आहेर तसेच चेतना नगर, नाशिक येथील अन्य तीन अनोळखी व्यक्तींविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.

**आळंदी येथे विवाह करून परतत असताना हल्ला**

फिर्यादीतील माहितीनुसार, महेश शिरसाठ व मानसी यांनी आळंदी येथे मित्रांच्या उपस्थितीत विवाह केला. विवाहानंतर नवदाम्पत्य मित्रांसह वाहनातून गावाकडे परतत असताना दिल्ली नाका परिसरात त्यांचे वाहन अडविण्यात आले. त्यानंतर आरोपींनी वाहनावर हल्ला करत त्याची मोठ्या प्रमाणात तोडफोड केली.

एमएच १२ जेसी २५७८ क्रमांकाच्या फोर्ड कारच्या पुढील तसेच मागील बाजूस आणि दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. यावेळी नवनाथ संदीप बुधकर, प्रेम मनोज ईंगे आणि दादासाहेब तांबे यांच्यावरही लोखंडी रॉड व हॉकी स्टिकने हल्ला करण्यात आल्याचा आरोप आहे.

हल्लेखोरांनी नववधू मानसी हिलाही मारहाण व दमदाटी केली. त्यानंतर तिला एमएच १५ सीटी ९३१८ क्रमांकाच्या तवेरा वाहनात जबरदस्तीने बसवून लोणीच्या दिशेने घेऊन गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. प्रेमविवाहाच्या कारणावरून घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच संगमनेर शहर पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. सहायक पोलीस निरीक्षक सचिन वाकडे यांनी पथकासह तत्काळ नाशिककडे रवाना होत आरोपींचा माग काढण्यास सुरुवात केली. आरोपींच्या अटकेसाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली असून, प्रकरणाचा तपास वेगाने सुरू आहे.

घटनास्थळी सहायक पोलीस निरीक्षक वाल्मीक ढोकरे तसेच पोलीस कर्मचारी मेढे यांनी भेट देऊन पाहणी केली. भरदिवसा दिल्ली नाका परिसरात झालेल्या या हिंसक प्रकारामुळे संगमनेर शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

## मंगळसूत्र चोरणारे स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - काकडवाडी येथील तुळसाबाई संपत शिरसाठ या २ ऑगस्ट रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास रस्त्याच्या कडेला बसची वाट बघत थांबल्या असताना अज्ञात चोरटयांनी पत्ता विचारण्याच्या बहाण्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र जबरीने चोरून नेले होते. याबाबत संगमनेर तालुका पोलीस स्टेशनला कलम ३०९ (६) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. गुप्त बातमीदारा मार्फत व तांत्रिक विश्लेषणातून या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार गुरुवारी आरोपींचा शोध घेत असता हा गुन्हा हर्षल राजेंद्र भांबारे (वय- २१) व निलेश विलास गायकवाड (वय -२७) दोघेही रा. कोऱ्हाळे, ता. राहाता यांनी केल्याचे निष्पन्न झाले. त्यांच्या राहत्या घरातून त्यांना ताब्यात घेऊन गुन्हयाच्या अनुषंगाने विचारपूस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा बलेनो गाडीचा वापर करून केला असल्याची कबुली दिली. ताब्यातील आरोपीकडून ६ लाख रुपये किमतीची बलेनो कार (एमएच. १७. डीसी. ४८६२) जप्त करण्यात आली आहे. आरोपींना गुन्ह्याच्या तपासकामी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड | रत्नागिरी | सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी | योनी मार्गाची दुर्गंधी
अंगावरून पांढरे जाणे | गुप्त अंगाला खाज
गर्भ न रहाणे | विविध त्वचा विकार
वारंवार गर्भपात होणे | गुप्तरोग, गर्मी
गर्भाशयात गाठी | लघवीला जळजळ
गर्भाशयाचा कर्करोग | संभोगात रस न येणे
स्तनांची वाढ न होणे | संभोगा विषयीची भीती
स्तनातून दूध न येणे | हस्तमैथूनाची सवय
स्तनात गाठी | लैंगिक विकृती
स्तनाचा कर्करोग | मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25